Dr. Babasaheb Ambedkar
Marathwada University
Chhatrapati Sambhajinagar-431004
Maharashtra (India)
NAAC Re-accredited 'A+' Grade

डॉ. बाबासाहेब आंबेडकर
मराठवाडा विद्यापीठ
छत्रपती संभाजीनगर-४३१००४. महाराष्ट्र (भारत)
नॅक समितीतर्फे 'अ+' दर्जा प्राप्त

Telephone
Office PBX : (0240) 2403399/400
C.O.E. : (0240) 2403200
Fax : (0240) 2403199/188
Website : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac
E-Mail : coe@bamu.ac.in

Office : Director, Board of Examinations & Evaluation

कार्यालय : संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ : परीक्षा/समन्वय/२०२५/ 689 दिनांक :१५.१०.२०२५

**प्रति,**
**प्राचार्य/संचालक**
**सर्व संलग्नित महाविद्यालय/परिसंस्था,**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,**
**छत्रपती संभाजीनगर**

विषयः हिवाळी-२०२५ च्या ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२५ मध्ये होणाऱ्या पदवी व पदव्युत्तर परीक्षा कॉपीमुक्त वातारणात पारपाडण्यासाठी विद्यापीठाच्या सर्व परीक्षा केंद्रावर बहिस्थ पर्यवेक्षक (External Supervisor) व परीक्षा केंद्रांना आकस्मित भेटी देण्यासाठी भरारी पथक यांची नियुक्ती करण्यासाठी महाविद्यालयातील विद्यापीठ मान्यता प्राप्त अध्यापकांचे नावे सादर करणेबाबत.

संदर्भ : मा. परीक्षा व मूल्यामपन मंडळाच्या दि. १४.१०.२०२५ रोजीच्या बैठकीत पारित ठराव.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, मा. परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या दि. १४.१०.२०२५ रोजी झालेल्या बैठकीतील ठराव क्र. ०४ व ०५ अन्वये हिवाळी-२०२५ च्या ऑक्टोबर/नोव्हेबर, २०२५ मध्ये होणाऱ्या पदवी व पदव्युत्तर परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पारपाडण्यासाठी विद्यापीठाच्या सर्व परीक्षा केंद्रावरांवर बहिस्थ पर्यवेक्षक (External Supervisor) व परीक्षा केंद्रांना आकस्मित भेटी देण्यासाठी भरारी पथक यांची नियुक्ती करण्यासाठी अनुदानित, विना अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयातील विद्यापीठ मान्यता प्राप्त अध्यापकांची माहिती मागविण्यात यावी, असा ठराव पारित करण्यात आलेला आहे.

त्यानुसार बहिस्थ पर्यवेक्षक (External Supervisor) यांची नियुक्तीकरिता किमान ०३ व भरारी पथकात नियुक्तीकरिता किमान ०२ विद्यापीठ मान्यता प्राप्त व अनुभवी अध्यापकांची नावे विद्यापीठास सादर करावीत. **तसेच भरारी पथकासाठी सादर करण्यात येणाऱ्या अध्यापकांमध्ये ०२ प्राध्यापक व एक प्राध्यापिका आदींचे सादर करणे अनिवार्य आहे.**

नावे

**कृ.मा.पहा**

**सबब, उपरोक्त प्रमाणे नोंद घेऊन सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार माहिती Microsoft Excel अंतर्गत Times New Roman Font मध्ये तयार करुन सॉफ्ट कॉपी तात्काळ coordination.exam@bamu.ac.in या ईमेल आयडीवर सोमवार, दि. २७.१०.२०२५ रोजीच्या आत पाठवून त्याची एक प्रत प्राचार्य/संचालक यांच्याकडून प्रमाणित करुन समन्वय कक्ष, परीक्षा व मूल्यमापन विभाग, विद्यापीठ परिसर यांना परीक्षा आवेदनपत्र सादर करण्यासाठी येणाऱ्या प्रतिनिधी सोबत पाठवावी.**

तसेच वरील माहिती सादर करतांना अध्यापकांची विद्यापीठाने दिलेल्या मान्यतेची प्रत जोडण्यात यावी.

सदरील बाबीची गांभीर्याने नोंद घेऊन तात्काळ नावे सादर करावीत, अन्यथा महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ४८(४) अन्वये प्रशासकीय कार्यवाही करण्यास्तव प्रस्तावित करण्यात येईल.

हे परिपत्रक विद्यापीठाच्या http://bamua.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहे. तसेच माहिती पाठविण्यासाठी विहित प्रपत्र जोडले आहे.

**सोबत : वरीलप्रमाणे**

17/10/2025

**संचालक**

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

बहिस्थ पर्यवेक्षक (External Supervisor) नियुक्ती अनुषंगाने सादर करावयाची अध्यापकांची माहिती

१. महाविद्यालय/परिसंस्थेचे नाव : ______________________________

२. महाविद्यालय/परिसंस्थेचा कोड : ______________________________

३. प्राचार्य/संचालकांचे नाव : ______________________________

४. भ्रमणध्वनी (मोबाईल नंबर) क्र. : ______________________________

५. महाविद्यालय/परिसंस्थेचा ई-मेल आयडी : ______________________________

| Sr. No. | Name of Teachers | Designation | Date of Joning | Mobile No. | Email ID | College/Institute Email ID | Teaching Subject | Faculty |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | | | | | | | | |
| 2. | | | | | | | | |
| 3. | | | | | | | | |

**महाविद्यालय/परिसंस्थेचा शिक्का** **प्राचार्य/संचालक**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

भरारी पथकात अध्यक्ष/सदस्य म्हणून नियुक्ती करण्याच्या अनुषंगाने सादर करावयाची अध्यापकांची माहिती

१. महाविद्यालय/परिसंस्थेचे नाव : ____________________

२. महाविद्यालय/परिसंस्थेचा कोड : ____________________

३. प्राचार्य/संचालकांचे नाव : ____________________

४. भ्रमणध्वनी (मोबाईल नंबर) क्र. : ____________________

५. महाविद्यालय/परिसंस्थेचा ई-मेल आयडी : ____________________

| Sr. No. | Name of Teachers | Designation | Date of Joning | Mobile No. | Email ID | College/Institute Email ID | Teaching Subject | Faculty |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | | | | | | | | |
| 2. | | | | | | | | |
| 3. | | | | | | | | |

**टिपः भरारी पथकासाठी सादर करण्यात येणाऱ्या अध्यापकांमध्ये एक प्राध्यापिकेचे अध्यापकाचे नाव सादर करणे अनिवार्य आहे.**

**महाविद्यालय/परिसंस्थेचा शिक्का**

**प्राचार्य/संचालक**